# वससी व्यापक रूपे...

**- सौ. मधुरिमा मिलिंद डबली** (कॅन्सस सिटी, कॅन्सस)



आदिमाया आदिशक्तीची अनेक रूपं आहेत. काही दुष्टांचं निर्दालन करणारी तर काही आपल्यावर मायेची पाखर घालणारी. याच रूपांमधलं एक प्रसन्न रूप म्हणजे गौराईचं.

श्रावण महिन्यात गणरायांबरोबरच या ज्येष्ठा- कनिष्ठा अनेकांच्या घरी येतात. सौख्याची पावलं उमटवीत, आशिर्वादाचे मोती उधळत येणाऱ्या या देखण्या गौरी- म्हणजे महालक्ष्म्या. महाराष्ट्रात हा सण पूर्वापार मोठ्या थाटामाटाने साजरा केला जातो. माझ्या मोठ्या मावशीकडे महालक्ष्म्या बसवीत असत. मी आणि माझी आई अतिशय हौसेनं त्यात सहभागी होत असू.

लग्न होऊन अमेरिकेत आल्यावर दरवर्षी सणांसाठी भारतात जाणं शक्यच नसायचं. तिथून येणाऱ्या फोटो आणि पत्रांमधल्या वर्णनांवरच समाधान मानावं लागत असे. पण महालक्ष्म्यांच्या सणाबद्दलच्या सगळ्या आठवणी विसरू म्हटलं तरी विसरल्या जात नव्हत्या.

२०१४ साली कॅन्ससला आलो. इथे सौ. सीमा आणि श्री. रमेश लोकरेंशी परिचय झाला. सीमानं त्यांच्या घरच्या महालक्ष्म्यांचं आवर्जून आमंत्रण दिलं. तिच्या घरी पहिल्यांदा दर्शनाला गेलो आणि थक्क झालो.

महालक्ष्म्या घरी बसवणं हे सोपं काम नाही. त्याला भरपूर पूर्वतयारी लागते. साड्या नेसवून, सगळ्या दागदागिन्यांचा साज चढवून त्या उभ्या करणं, त्यांच्या भोवतीची सजावट, हे तर झालंच. पण शिवाय महालक्ष्म्यांचा नैवैद्यही सोपा नसतो. सोळा भाज्या, पंचपक्वान्नं, पुरण असा सगळा घाट असतो. भारतात अनेकदा गौरी बसवण्याच्या वेळी बरेचसे नातेवाईक मदतीला येतात. नोकरमाणसंही असतात. आजकाल बऱ्याच गोष्टी विकत मिळण्याचीही सुविधा असते. परदेशात मात्र खूपच वेगळं चित्र असतं. नातेवाईक भारतात असतात. नोकरी, इतर सगळं एकट्याने सांभाळून इथे घरी महालक्ष्म्या बसवणे हे खरोखरच अतिशय कौतुकास्पद म्हणायला हवं. बऱ्याच वस्तू, साधनसामुग्री इथे मिळतही नाही. अशा परिस्थितीत सौ. सीमा व श्री. रमेश गेली कित्येक वर्षं इथे अमेरिकेत कॅन्सस राज्यात- घरी महालक्ष्म्या बसवीत आहेत. यंदाचे वर्ष हे त्यांच्या महालक्ष्म्यांचं १५वे वर्ष.

श्री. रमेश यांच्या घरी- म्हणजे सीमाच्या सासरी भारतातही तिच्या सासूबाई महालक्ष्म्या बसवीत असत. साखरपुड्यानंतर सीमा एकदा महालक्ष्म्यांचं दर्शन घ्यायला गेली असताना तिला ते सगळंच फार आवडलं. पुढे लग्न होऊन ती अमेरिकेत आली. तिच्या मनात घरी महालक्ष्म्या बसवायची फार इच्छा होती. पण गौरींचे मुखवटे, इतर वस्तू इथे मिळणं ही अशक्यप्राय गोष्ट होती. शिवाय घरी भारतात आधीपासूनच महालक्ष्म्या बसत असताना इथे बसवलेल्या चालतील का हादेखील प्रश्न तिच्या मनात होताच. पण मनातल्या तीव्र इच्छेनं सगळ्या अडचणींवर मात केली. गुजराती दुकानांमधे मिळालेल्या बाहुल्या वापरून सीमाने घरी महालक्ष्म्या बसवल्या. तिच्या सासूबाईंना भारतात हे कळल्यावर सुनेच्या आवडीबद्दल कौतुक वाटलं. पुढच्या वेळी सीमा भारतात गेली तेव्हा त्यांनी सगळं महालक्ष्म्यांचं साहित्य तिच्यासाठी अगदी आवर्जून घेऊन ठेवलं होतं. शिवाय इथे अमेरिकेतही तिनं गौरी बसवायला हरकत नाही असं सांगितलं. आणि अशा रीतीने त्यांच्या अमेरिकेतल्या घरी गौराई नित्यनेमाने मुक्कामाला येऊ लागल्या.

आता दरवर्षी हा सण लोकरे दांपत्याच्या घरी अगदी हौसेनं साजरा होतो. सीमा भारतातून दरवर्षी खास सारख्या साड्या मागवते. खीर, पुरण, सारं गोडधोड तर करतेच- पण इतरही रीतीरिवाज अगदी कसोशीनं पाळते. आता खरं म्हणजे भारतातही कित्येक ठिकाणी चिरलेल्या मिश्र भाज्यांची पाकिटं या सणासाठी बाजारात विकत मिळतात. पण सीमा मात्र इथे अमेरिकेत सोळा भाज्यासुध्दा वेगवेगळ्या करते. महालक्ष्म्यांची सजावटदेखील दरवर्षी वेगळी आणि चित्तवेधक करण्याकडे तिचा कल असतो. यावर्षी पैठण्या वापरून सीमाने आजूबाजूला सुरेख सजावट केली होती. या सगळ्या पूर्वतयारीमधे आणि हौसेनं सण साजरा करण्यामधे श्री. रमेश लोकरेंचाही आवर्जून सहभाग असतो. शिवाय सोबतीला सीमाच्या मैत्रिणीही असतातच. महालक्ष्म्या बसवण्याच्या दिवसापासून ते गौरीविसर्जनापर्यंत त्यांची साथ असते. या सगळ्या सख्यांशिवाय हे शक्यच झालं नसतं असं सीमा सांगते. प्रत्येक वर्षी कोणाची ना कोणाची मदत मिळतच जाते. अन सारं मनासारखं- सुफळ संपूर्ण झाल्यावर गौराईंच्या मूर्ती इतक्या सुंदर, इतक्या तेजस्वी दिसतात की अगदी नजर खिळून राहते. हात आपसूकच जोडल्या जातात.



उभयता पतीपत्नी संगणक क्षेत्रात काम करत असूनही हा सण इतक्या मोठ्या प्रमाणावर आणि अगदी पारंपरिकरित्या अमेरिकेतही साजरा करणाऱ्या सौ. सीमा व श्री. रमेश लोकरेंचं कौतुक करावं तेवढं थोडंच आहे. गौराईंची अशीच सेवा दरवर्षी त्यांच्या हातून घडो, ही सदिच्छा.